सत्यमेव जयते

महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी

(महाराष्ट्र शासनाची नोंदणी क्र. GBBSD ४८८/२०१९ खाली नोंदणीकृत स्वायत्त संस्था
व भारत सरकार मार्फत दि. २५-१०-२०१९ अन्वये मान्यताप्राप्त)

मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय

रुग्णालयीन इमारत, १ ला मजला, गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०१८.

ई-मेल:conman.mhesis@gmail.com

क्र.मुकाअ/महा-राकाविसो/वाहन विक्री /का.क्र.३/ 26331-50 /२०२६, दि. 11 AUG 2026

विषय :- महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालयातील ०१ शासकीय वाहन MH-०१-AN-०९१५ चे निर्लेखन पश्चात वाहन विक्री करण्याकरीता आपल्या कार्यालयाच्या जाहिरात फलकावर जाहिरात प्रसिध्द करणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयांस अनुसरुन संदर्भाकित पत्र क्र ०२ अन्वये या कार्यालयातील ०१ शासकीय वाहन MH-०१-AN-०९१५ चे निर्लेखन पश्चात वाहन विक्री करण्याकरीता महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालयातील वाहन निर्लेखन समितीचे अध्यक्ष यांनी या कार्यालयाचे अधिनस्त असलेले वैप्रअ कार्यालये व रुग्णालये यांना त्यांच्या संबंधीत जाहिरात फलकावर जाहिरात प्रसिध्द करण्याबाबतचे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार सदर पत्र आपल्या जाहिरात फलकावर जाहिरात देऊन सदर जाहिरात खालील प्रमाणे प्रसिध्द करुन त्याबाबतचा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा .

जाहिरातीचा नमूना

जाहिरातीचे पत्र

उपरोक्त जाहिरात प्रसिध्द केलेल्या कार्यालयाचे नाव ________________

जाहिराती प्रसिध्द केल्याचे दिनांक : - १२.०८.२०२६

साक्षीदार म्हणून ०२ चतुर्थश्रेणी कर्मचारी यांचे नाव व सही

जाहिरात प्रसिध्द करताना काढलेले फोटोची प्रत सोबत जोडण्यात यावी.

जाहिरात पत्रक

विषय :- महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालयातील ०१ शासकीय वाहन MH-०१-AN-०९१५ चे निर्लेखन पश्चात वाहन विक्री करणेबाबत.

निविदा संदर्भात अटी व शर्ती खालील प्रमाणे :-

१. मोहोरबंद पाकिटात निविदा प्रसिद्धीची जाहिरात दिनांकापासून ०७ दिवसापर्यंत म्हणजेच **दि.२०.०८.२०२६ पर्यत** या कालावधीत सकाळी 11.00 ते 04.30 वाजेपर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी मा. संचालक (प्रशासन), आयुक्त कार्यालय, राज्य कामगार विमा सोसायटी, पहिला मजला, रा.का.वि.यो रुग्णालय, वरळी, मुंबई – ४०००१८ येथे सादर करावी. त्यावर **वाहन क्र.MH-०१-AN-०९१५ या वाहनाच्या विक्रीसाठी** असा स्पष्ट उल्लेख असावा.

२. जसे आहे तशा स्थितीत विक्रीकरीता असलेले वाहन आयुक्त कार्यालय, राज्य कामगार विमा सोसायटी, पहिला मजला, रा.का.वि.यो रुग्णालय वरळी, गणपत जाधव मार्ग, मुंबई – ४०००१८ या आवारात उभे करण्यात आले आहे. सदर वाहन निविदा सादर करणा-या इच्छुकाला निविदा कालावधीत या ठिकाणी पाहता येईल. (सोबत फोटो जोडलेला आहे)

३. ज्यांना रजिस्टर पोस्टाने निविदा पाठवायची आहे, त्यांनी निविदा प्रसिद्धीची जाहिरात दिनांकापासून ०७ दिवसापर्यंत म्हणजेच दि.२०.०८.२०२६ पर्यत या कार्यालयास पोहोचतील अशा बेताने पाठवावी, अन्यथा वरील कालावधीत समक्ष सादर करावी.

४. उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय दि.०१.१२.२०२६ अन्वये निविदाकारास निविदेत भाग घेण्याकरीता रुपये २०००/- इतके निविदा शुल्क (ना परतावा) आयुक्त कार्यालय, राज्य कामगार विमा सोसायटी, पहिला मजला, रा.का.वि.यो रुग्णालय वरळी, गणपत जाधव मार्ग, मुंबई – ४०००१८ या कार्यालयातील लेखा शाखेस जमा करणे बंधनकारक राहील. तसेच, रु.१०,०००/- इतकी बयाणा रक्कम (परतावा) या कार्यालयातील **"Account Officer Office of the Commissioner ESIS Mumbai"** यांच्या नावाने काढलेल्या राष्ट्रीयकृत बँकेच्या धनाकर्षाच्या स्वरुपात निविदा लिफाफ्यामध्ये जमा करणे बंधनकाराक आहे. तसेच सदर निविदा या कार्यालयातील निविदा बॉक्स मध्ये जमा करणे आवश्यक आहे.

५. रोख शाखा, आयुक्त कार्यालय, राज्य कामगार विमा सोसायटी, पहिला मजला, रा.का.वि.यो रुग्णालय वरळी, गणपत जाधवP मार्ग, मुंबई - ४०००१८ येथे इसा-याची रक्कम भरलेली पावती निविदा अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. इसा-याची रक्कम भरल्याचा पुरावा सोबत जोडला नसल्यास निविदा ग्राहय धरली जाणार नाही.

६. निविदा उघडण्याच्यावेळी निविदाधारक किंवा अधिकृत प्रतिनिधी यांना हजर राहता येईल.

७. यशस्वी निविदाकारास निविदा सफल झाल्याचे कळल्यापासून रोख रक्कम भरुन एका आठवडयात वाहनाचा प्रत्यक्ष ताबा घेणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची निविदा रददबातल ठरविली जाईल व इसा-याच्या रक्कमेस त्यास मुकावे लागेल.

८. यशस्वी निविदाधारकास, विक्रीकर अधिनियमानुसार वाहनावरील आवश्यक तो विक्रीकर भरावा लागेल किंवा वाहनावा प्रत्यक्ष ताबा मिळण्यापूर्वी कर भरल्याबाबतचा लेखी पुरावा सादर करावा लागेल.

९. यशस्वी निविदाधारक नियम व अटीनुसार करार पूर्ण करु शकत नसल्याचे दिसून आल्यास त्याने भरलेल्या इसा-याची रक्कम जप्त करण्यात येईल.

१०. मा. संचालक (प्रशासन), आयुक्त कार्यालय, राज्य कामगार विमा सोसायटी, पहिला मजला, रा.का.वि.यो रुग्णालय वरळी, गणपत जाधव मार्ग, मुंबई – ४०००१८ हे कोणतेही कारण न देता कोणतीही किंवा सर्व निविदा फेटाळू शकतात.

११. सदर वाहन हस्तांतरण नोंदणीबाबत सर्व प्रक्रिया यशस्वी निविदाकारास स्वखर्चाने करावी लागेल.

१२. प्रशासकीय किंवा तांत्रिक कारणास्तव वरील निविदा सादर करावयाच्या किंवा उघडण्याच्या वेळापत्रकात बदल होवू शकतो.

तसेच सोबत **निविदा प्रपत्र** (दरपत्रकासोबत सादर करावयाची कागदपत्रे) जोडण्यात येत आहेत.

(सोहम वायाळ)
संचालक (प्रशासन)
मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालय,
महा-राकावि सोसायटी, मुंबई – १८.

प्रति,

१. वैद्यकीय अधीक्षक, महा-राकावि सोसायटी रूग्णालय,
वरळी, कांदिवली, मुलुंड, ठाणे, वाशी, उल्हासनगर, पुणे, नाशिक, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, नागपूर यांना माहिती व पुढील कार्यवाहिसाठी.

२. वैद्यकीय प्रशासन अधिकारी, महा-राकावि सोसायटी,
वरळी- मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर यांना माहिती व पुढील कार्यवाहिसाठी.

३. लेखविभाग – या कार्यालयातील यांना माहितीस्तव

निविदा प्रपत्र

दिनांक :-

वाहनाचा तपशील :-

वाहन क्रमांक	वाहनाचा प्रकार	वाहनाचे मॉडेल वर्ष	इंधनाचा प्रकार	वाहनाची स्थिती	वाहनाची धावसंख्या
MH-01-AN-0915	LMV Honda Mobilo 1.5 V (0) MT (I VTEC)	2015	Petrol	चालू स्थितीत	1,51,941 कि.मी.

निविदा दर पत्रक

अ.क्र	वाहन	वाहनाची हातची किंमत	निविदाकाराने नमूद करावयाची किंमत
१	MH-01-AN-0915 LMV Honda Mobilo 1.5 V (0) MT (I VTEC)	१,३७,०००/-	

- **दरपत्रकासोबत सादर करावयाची कागदपत्रे :-**

६. खरेदीदार यांचे ०२ पासपोर्ट साईज फोटो .
७. ओळखीचा पुरावा (पॅनकार्ड/अधाराकार्ड/पासपोर्ट/मतदार ओळखपत्र इ. कोणतेही एक)
८. कंपनी/फर्मच्या नावे वाहन खरेदी करावयाचे असल्यास त्याचे वस्तू व सेवाकर अंतर्गत नोंदणी असल्याचे प्रमाणपत्र.
९. इसा-याची रक्कम भरलेली पावती क्रमांक / छायाप्रत.
१०. निविदेची शुल्क रक्कम रु.२,०००/- भरलेली पावती क्रमांक / छायाप्रत.

सोबत जोडलेली कागदपत्रे

निविदाकाराचे नाव :-
पत्ता :-
स्वाक्षरी :-
दुरध्वनी क्रमांक :-

MH.01.AN.0915
महाराष्ट्र शासन
HONDA